# ॥ज्योतिर्मय॥

Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष २ रे ❑ अंक ३६ वा ❑ भारतीय सौर दिनांक २३ फाल्गुन शके १९४७, शनिवार दि.१४ मार्च २०२६ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)


## विशेष लेख...

### लवकर या, लवकर जा...

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

**ज्योतिर्मय साहित्य**

एका महिलेचं दुःख एक महिलाच समजू शकते.याचा प्रत्यय महिला दिनी आला. महाराष्ट्राच्या उपमुख्यमंत्री सुमित्रा पवार यांनी नोकरदार महिलांसाठी एक खुश खबर घोषणा घेऊन आल्या...आणि ती घोषणा म्हणजे,लवकर या,लवकर जा.. जागतिक महिला दिनाचे औचित्य साधत विधिमंडळ अधिवेशनात राज्याच्या नवनिर्वाचित उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार राज्यातील महिला कर्मचाऱ्यांसाठी मोठी घोषणा केली. लवकर या, लवकर जा.. म्हणत महिलांना कामाच्या ठिकाणी लवकर आल्यास लवकर जाण्याची मुभा देण्यात येणार आहे.

मुंबई महानगर क्षेत्रातील शासकीय कर्मचारी महिलांसाठी प्रणाली लागू करण्यात येत आहे,असल्याची घोषणा सुमेत्रा पवार यांनी केली. शासकीय नोकरीत असलेल्या महिला सकाळी ९.१५ वाजता कार्यालयात आल्या तर घरी जाताना त्यांना अर्धा तास लवकर सोडण्यात येईल, अशी घोषणा सुनेत्रा पवार यांनी विधानपरिषदेतून केली. या सवलतीमुळे

अधिकारी महिलांचा प्रवास त्रास कमी होण्यास योग्य मदत होणार आहे.

उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी स्पष्ट केले की, या योजनेअंतर्गत मुंबई महानगरातील शासकीय महिला कर्मचाऱ्यांना सकाळी ९.१५ ते ९.४५ या वेळेत कार्यालयात लवकर येऊन जितक्या मिनिटांनी आधी काम सुरू करतील, तितक्याच मिनिटांनी संध्याकाळी कार्यालयातून लवकर निघता येणार आहे. यामुळे साधारणपणे ३० मिनिटांची सवलत मिळणार आहे. या निर्णयामुळे मुंबईतील गर्दीच्या वेळेत (पीक आवर्स) महिलांना होणारी असुरक्षितता, प्रवासातील त्रास आणि वेळेची अडचण मोठ्या प्रमाणात कमी होईल. महिलांना घर आणि कार्यालय यांच्यातील संतुलन साधणे सोपे होईल, असे सुनेत्रा पवार यांनी सांगितले.

मुंबई लोकल हा नोकरदार महिलांसाठी रोजचा संघर्ष असून, प्रचंड गर्दीमुळे प्रवास जीवघेणा आणि थकवणारा ठरतो.

बुरखा घालून पुरुषांचा महिलांच्या डब्यात प्रवेश आणि विनयभंगाच्या घटनांमुळे सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

सुरक्षिततेसाठी लेडीज स्पेशल ट्रेन्स, महिला डब्यात पोलीस (होमगार्ड्स) तैनात आणि नुकतेच क्यूआर कोड स्कॅनिंगचे नियोजन केले जात आहे. तसेच, कामाच्या वेळेत लवचिकता आणून महिलांचा ताण कमी करण्याचा प्रयत्न प्रशासन करत आहे.

मुंबईतील नोकरदार महिलांचा लोकल प्रवास हा प्रचंड गर्दीमुळे शारीरिकदृष्ट्या थकवणारा आणि असुरक्षित ठरत आहे

महिलांच्या डब्यात रेल्वे पोलिसांची उपस्थिती वाढवण्यात आली आहे. रात्रीच्या वेळी सुरक्षिततेसाठी क्यूआर कोडची मदत घेतली जात आहे. पश्चिम रेल्वेवर महिला स्पेशल ट्रेन्स, ज्यांना लेडीज स्पेशल म्हणतात, महिला प्रवाशांसाठी एक विश्वासार्ह पर्याय ठरल्या आहेत, यासाठीच

नोकरदार महिलांसाठी कामाच्या ठिकाणी वेळ लवचिक ( , ) करण्याचा संकल्प व प्रयत्न महाराष्ट्र सरकार करत आहे.त्याचाच एक भाग म्हणून उपमुखमंत्री सुनेत्रा पवार यांनी लवकर या, लवकर जा ची घोषणा केली.

मुंबई लोकलमध्ये प्रवास करणाऱ्या महिलांना दररोज अनेक आव्हानांना आणि त्रासाला सामोरे जावे लागते.

पीक अवर्समध्ये (सकाळ आणि संध्याकाळ) डब्यात चढणे आणि उतरणे अत्यंत कठीण होते. मर्यादित डब्यांमुळे होणाऱ्या या गर्दीत महिलांना शारीरिक त्रासाला सामोरे जावे लागते.

विद्रुपीकरण आणि छेडछाड हा लोकल ट्रेन मधील गंभीर प्रकार. गर्दीचा फायदा घेऊन अनेकदा महिलांची छेडछाड किंवा विनयभंगाच्या घटना घडतात. अलीकडेच एका चार दिवसांच्या कालावधीत विनयभंगाच्या ७ घटनांची नोंद झाली आहे.

अनधिकृत प्रवेश: महिलांसाठी राखीव असलेल्या डब्यात पुरुष शिरण्याच्या घटना वारंवार घडतात. काही घटनांमध्ये पुरुष बुरखा घालून किंवा डब्याच्या दारात स्टंट करून महिलांना त्रास देताना आढळले.लोकल ट्रेनमध्ये महिलाना होणारा त्रास बघता सुनेत्रा पवार यांनी महिला हिताचा निर्णय घेतल्याने या निर्णयाची स्तुती होत आहे.

एक महिला दुसऱ्या महिलेच्या आयुष्यातील ताणतणाव, वेदना आणि संघर्ष योग्यरित्या समजू शकते.: एक स्त्री दुसऱ्या स्त्रीला मानसिक दृष्ट्या सशक्त बनवू शकते आणि कठीण प्रसंगात योग्य तोडगा काढण्यास मदत करू शकते.

# आदिवासी पाड्यांवर "मुलीचा जन्म" हा उत्सवी आनंद सोहळा – सौ. रुपालीताई चाकणकर

**ज्योतिर्मय साहित्य**

नांदेडसिटी पुणे – रामराज्य जेष्ठ नागरिक संघ, नांदेड सिटी तर्फे महिला दिनाचे औचित्य साधून ''स्त्री सन्मान सोहळ्याचे'' शुभ कल्याण क्लब हाऊस मध्ये नुकतेच आयोजन करण्यात आले होते. संघाचे सन्माननीय सदस्य आणि गणमान्य नागरिक बंधू भगिनींनी या सोहळ्यास उत्तम प्रतिसाद दिला. या सोहळ्याची सुरुवात दिवंगत सभासदांना मुक श्रद्धांजली अर्पण करण्याने झाली. यावेळी व्यासपीठावर रामराज्य ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष प्रा. शिरीष पाटील, उपाध्यक्ष श्री बबनराव कोडीतकर, प्रमुख अतिथी सौ. रुपालीताई चाकणकर (अध्यक्ष, महाराष्ट्र महिला आयोग ) विशेष अतिथी सौ. अनिताताई इंगळे (नगरसेविका मनपा पुणे), सौ धनश्रीताई कोल्हे (नगरसेविका, मनपा पुणे) व डॉ. शितल पाटील (संचालक, सहयोग पॅथॉलॉजी लॅब,नांदेड सिटी ,पुणे) उपस्थित होते.




दीप प्रज्वलन आणि श्री गणेश प्रतिमा पूजन पाहुण्यांच्या हस्ते पार पडले. कु. ईश्वरी कुलकर्णी हिने ''नटेश कौतुकम'' सुंदर भरतनाट्यम द्वारे सादर केले. सौ.वृषालीताई साठे यांनी छानसे स्वागत गीत सादर केले. प्रा.शिरीष पाटील यांनी प्रास्ताविक केले. स्त्री ची चार रूपं आहेत. मुलगी, बहीण, पत्नी आणि आई. पण या सर्वात लक्षणीय, हृदयाचा ठाव घेणारं, निर्मळ, प्रेमळ, पाहता क्षणीच डोळ्याचं पारणं फेडणारं, आपल्या आयुष्याच्या सर्वात जवळच रूप म्हणजेच ''आई''. आपल्या सगळ्यांच्या अस्तित्वाचं मूळ म्हणजे आई. म्हणून ''आईचा'' सन्मान हा समस्त स्त्री जातीचा सन्मान आहे. हे मत त्यांनी व्यक्त केलं व गेल्या वर्षभरातील ''रामराज्य'' च्या विविध कार्यक्रमांचा आढावा घेतला. आपापल्या क्षेत्रात भरीव समाजकार्य करणाऱ्या व्यासपीठावर उपस्थित सर्व अतिथी भगीनींचा परिचय त्यांनी आपल्या विशेष शैलीत करून दिला. हा परिचय समाजाला निश्चितच दिशादर्शक आहे असेही ते म्हणाले.यानंतर मागील दीड महिन्यात रामराज्यच्या ज्या सभासदांचे वाढदिवस होते, त्यांचे प्रमुख अतिथींच्या हस्ते गुलाबपुष्प देऊन अभिष्टचिंतन करण्यात आले. प्रमुख अतिथी सौ. रूपालीताई चाकणकर यांनी आपल्या ओघवत्या शैलीत राज्य महिला आयोगाच्या कार्यावर प्रकाश टाकला. आदिवासी पाड्यावरील मुलीच्या जन्माचा उत्सव तीन दिवस पर्यंत त्या ठिकाणी साजरा होतो. या दरम्यान आनंदाला उधाण आले असते. मुलीकडे ईश्वराचा पवित्र अंश म्हणून पाहिल्या जाते. पण सुशिक्षित शहरी भागात मात्र परिस्थिती वेगळी दिसते. या विरोधाभासावर त्यांनी कडाडून टीका केली. स्त्री अतिशय कठीण अशा प्रसववेदना सहन करून बाळाला जन्म देते हा स्त्रीचा पुनर्जन्मच असतो. हे एका अर्थाने स्त्रीचे समाजावर ऋणच आहे. आपलं घर सांभाळून महिला हल्ली सर्व क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय कामगिरी करीत आहेत. इतकेच नव्हे तर महिला आहेत म्हणून पुरुष मंडळी विविध क्षेत्रात यशस्वीपणे वाटचाल करीत आहेत. त्यामुळे महिला दिन हा केवळ एक दिवस कसा होऊ शकतो ? वर्षातील ३६५ दिवस हे खऱ्या अर्थाने महिला दिवसच आहेत हा विचार त्यांनी या प्रसंगी मांडला. यावेळी नगरसेविका सौ अनिताताई इंगळे यांनी शिवणे – नांदेड सिटी पूल प्रश्न तसेच प्रभागाचे विविध प्रश्न मार्गी लावण्यासाठी आग्रही पाठपुरावा करण्याबद्दल प्रतिपादन केले. तसेच नगरसेविका सौ. धनश्रीताई कोल्हे यांनी प्रभागातील रस्ते, पाणी प्रश्न, जनतेच्या मूलभूत सुविधांसाठी पाठपुरावा करण्याचे सूतोवाच केले. डॉ. शितल पाटील यांनी सहयोग पॅथॉलॉजी लॅब च्या माध्यमातून सुरू असलेले कार्य आणि या प्रसंगी गौरव केल्याबद्दल आभार व्यक्त केले .याप्रसंगी उपस्थित सर्व अतिथी भगिनींना शाल, पुष्पगुच्छ व ''श्री रामराज्य सेवाव्रती '' सन्मानचिन्ह* देऊन गौरव करण्यात आला. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन सौ. वंदना सोमठाणकर यांनी केले तर कार्यक्रमाचे संचलन सौ. सविताताई आठरे यांनी केले. या कार्यक्रमात उपस्थित मान्यवरांचे श्री पंकज जी देडगे (अध्यक्ष, शुभ कल्याण), श्री. विकास जी देडगे (अध्यक्ष, मधवंती), श्री अविनाश जी लगड (समाजसेवक), श्री.देविदास जी लगड, श्री.राजेंद्रजी मते, श्री पांडुरंगजी कानगुडे, (मा. पंचायत समिती सदस्य), श्री महादेव करंजकर यांचे गुलाब पुष्प देऊन स्वागत करण्यात आले.

या प्रसंगी साहित्यिक श्री गिरीश वसेकर. सौ रचना वसेकर, सौ विमल लांडगे,श्री विनायक जोशी आदी उपस्थित होते.

कलाश्री सोसायटीचे सदस्य व सेवानिवृत्त सैन्य अधिकारी श्री ज्ञानेश्वर सोळसकर, श्री शशिकांत तजबिजे, हे ही उपस्थित होते. तसेच ज्येष्ठ महिला वर्गात सौ शीला गोवर्धन,सौ अंजली लागवणकर, सौ सुनयना वाडये श्रीमती इंदुमती देडगे श्रीमती अपर्णा जयंत या आणि अनेक सन्मानीय महिला सदस्या उपस्थित होत्या

कार्यक्रमाचे यशस्वीतेसाठी श्री शिवाजी खेसे, श्री प्रमोद कुळकर्णी, श्री प्रमोद पाटील, श्री मारुती सावंत, सौ.वंदना सोमठाणकर, सौ.ललिता कुलकर्णी, सौ.शोभा साळुंखे, श्री.सतीश खानझोडे या विश्वस्तांनी विशेष परिश्रम घेतले. प्रमुख अतिथी सौ. रूपालीताई चाकणकर यांची उपस्थिती महिलांसाठी निश्चितच प्रेरणादायी होती. हा ''स्त्री सन्मान सोहळा'' रंगतदार झाल्याबद्दल उपस्थित श्रोत्यांनी आनंद व समाधान व्यक्त केले. शुभ कल्याण सभागृहात प्रेक्षकांनी कार्यक्रमासाठी एकच गर्दी केली होती. चहापानाने या आनंदी सोहळ्याची सांगता झाली.

# डोनाल्ड ट्रम्प यांचा गल्फ प्रदेशातील राजकीय गोल्फ

राजकारण आणि खेळ यांचा निकटचा संबंध असतो. डोनाल्ड ट्रम्प यांना गोल्फ खेळणे फार आवडते गोल्फ म्हणजे जणू त्यांचा जीव की प्राण जगातील चार देशातील १८ शहरामध्ये योजना करून मोठी गुंतवणूक करून गोल्फ मैदाने उभारली आहेत. आखातातील प्रमुख प्रदेशांमध्ये त्यांनी भरपूर गोल्फ मैदानी उभी केली आहेत. अमेरिकेचे अध्यक्ष जगाच्या कुठल्याही भागात गेले तरी गोल्फ खेळू शकतात, परंतु यावेळी डोनाल्ड ट्रम्प यांचे राजकारण पुन्हा एकदा गोल्फ मैदानावर आले आहे. इराणविरोधात हाती घेतलेली डोनाल्ड ट्रम्प यांची इपिक फ्युरी ही मोहीम म्हणजे एक प्रकारचा राजकीय गोल्फच म्हटले पाहिजे या गोल्फ खेळात पहिल्या दहा दिवसात ट्रम्प यांचा वरचा हात राहिला आहे, जमिनीचा काटा काढण्यात त्यांना आलेले यश आणि इराणची दहापेक्षा जास्त जहाजे त्यांनी बुडविले आहेत. आपण युद्ध जिंकण्यास सुरुवात केली आहे असा दावा ते करत आहेत, त्यांच्या राजकीय गोल्फ खेळाचे प्रस्तुत लेखात आकलन केले आहे.



**अमेरिका फर्स्ट धोरणाचा परिपाक**

पश्चिम आशिया म्हणजे गल्फ देशातील डोनाल्ड ट्रम्प यांचे धोरण म्हणजे त्यांच्या अमेरिका प्रथम या सिद्धांताचा व्यत्यास म्हटले पाहिजे. त्यांचे हे धोरण २०२५ च्या गोपनीय अहवालावर आधारलेले आहे त्यानुसार त्यांना आखातातील राजकीय उद्दिष्टे साध्य करावयाची आहेत. एखादा मध्ये मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक सिद्ध करणे सुरक्षित करणे आणि राजकीय प्रभुत्व सुद्धा वाढविणे यावर त्यांचा भर आहे. त्यासाठी आखाती देशाबरोबर त्यांनी प्रथम संरक्षण सहकार्यासाठी हात पुढे केला, पारंपरिक राजकीय मर्यादा आणि प्रणाली बाजूला ठेवून त्यांनी आखातामध्ये नव्या व्युवरचनेस प्रारंभ केला. अमेरिकेचे हितसंबंध सुरक्षित करणे आर्थिक आणि राजकीय प्रभुत्व वाढविणे यावर त्यांनी भर दिला आहे.

उच्च स्तरावरील वैयक्तिक हितसंबंध आणि राजकारण यांचे मोठे अनोखे अद्भुत मिश्रण ट्रम्प यांच्या गल्फ धोरणामध्ये सामावले आहे. इराणला रोखणे आणि त्यासाठी आखातामध्ये अमेरिकन लष्करी तळांचे सामर्थ्य वाढविणे यावर त्यांनी गेल्या वर्षभरातून भर दिला होता. सौदी अरेबिया, कतार सारख्या छोट्या देशांमध्ये अमेरिकन लष्कराचे सामर्थ्य तर वाढविलेच शिवाय अमेरिकेमध्ये मोठी भांडवली गुंतवणूक त्यांनी खेचून आणली त्यामुळे त्यांचे दुहेरी सामर्थ्य वाढले आणि इराण विरुद्ध कारवाई करण्यासाठी आवश्यक वातावरण निर्मिती सुद्धा ते करू शकले आहेत.




**राजकीय गोल्फची पूर्वतयारी**

पश्चिम आशियामध्ये म्हणजे गल्फ प्रदेशात आपले प्रभुत्व वाढविण्यासाठी डोनाल्ड ट्रम्प यांनी नवे राजकीय स्थापत्य संरक्षित केले आहे तसे करताना त्यांनी राजकीय गो खेळाची पूर्वतयारी केली आहे अचूकता आक्रमकता आणि नेमबाजीतील भेळकता ही डोनाल्ड ट्रम्प यांची गोल खेळातील खासियत आहे, त्याप्रमाणे गल्फ च्या राजकारणात सुद्धा त्यांनी हेच तंत्र वापरले आहे. त्यांच्या रचनात्मक डावपेचांचे राजकीय व्यवस्थापन समजावून घेतले पाहिजे. प्रादेशिक व्यवस्थेचे संरक्षण करताना त्यांनी आखाताच्या तेलावर नियंत्रण ठेवणे आणि अमेरिकन लष्कराचे प्रभुत वाढविणे अशी दुहेरी उद्दिष्टे ठेवली आहेत.

आपल्या राजकीय गोल्फ ची पूर्वतयारी करताना डोनाल्ड ट्रम्प यांनी प्रामुख्याने काही निश्चित उद्दिष्टे ठरविली आहेत त्यानुसार अमेरिकेची अर्थव्यवस्था बळकट करणे, आणि अखातून अमेरिकेत गुंतवणूक वाढविणे. हे प्रधान उद्दिष्ट होते शिवाय त्यांनी आखातातून सार्वभौम संपत्ती अमेरिकेच्या बाजूने वळविणे आणि अमेरिकेच्या पायाभूत सुविधा मजबूत करण्यासाठी त्यांचा उपयोग करणे तसेच तंत्रज्ञान आणि ऊर्जा क्षेत्रात अमेरिकेची बाजू बळकट करणे हे प्रमुख उद्दिष्ट समोर ठेवून त्यांनी आखाती धोरणाची मांडणी केली हातातून एक ट्रिलियन डॉलर पेक्षा अधिक संपत्ती अमेरिकेकडे वळविणे हे ध्येय समोर ठेवून ट्रम्प यांनी मांडणी केली आहे इराण विरुद्ध युती मजबूत करणे हे ट्रम्प यांच्या गल्फ दुसरे उद्दिष्ट होते त्यानुसार त्यांनी आखातातील अनेक देशांना अमेरिकेकडे वळविण्याचा प्रयत्न केला. प्रथमतः सौदी अरेबिया आणि तसेच बहारीन सारख्या भागीदार अशी संबंध मजबूत करण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे इराणच्या अणू आणि क्षेपणास्त्र कार्यक्रमांना आधार निर्माण करण्यासाठी संयुक्त आघाडी निर्माण होईल असा त्यांचा प्रयत्न होता शिवाय ट्रम्प यांनी अनु वस्त्र विक्री आणि संरक्षण करारावर सुद्धा भर दिला औद्योगिक संबंध अधिक दृढ करण्यासाठी आणि अमेरिकेचे वर्चस्व बळकट करण्यासाठी लॉक हिट मार्टिन आणि बोईंग यासारख्या महत्त्वाच्या संरक्षण करारावर स्वाक्षरी करणे हा सुद्धा या धोरणाचा एक भाग होता ऊर्जा बाजार व्यवस्थापन हे सुद्धा ट्रम्प यांच्या नव्या गोल्फनीतीचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य होय त्यासाठी त्यांनी अमेरिकन अर्थव्यवस्थेला बळकटी प्राप्त व्हावी यासाठी जागतिक तेलाच्या किमती कमी ठेवण्याचे सूत्र समोर ठेवले. **(क्रमशः)**




जाहिरात व्यवस्थापक, ज्योतिर्मय साहित्य, पुणे




## जात्यावरच्या ओव्या......

बाप सांगतो माऊली ला
जातो बाईला मुर्हाळी
लेकराची झाली माय
लेक दिसती दुबळी ||५४२||

मामा मुर्हाळी आला
मायीनं परतून लावला
लेक आली माहेराला
तिला नांदण सासराला ||५४३||

©® सौ. मनोरमा बोराडे
छत्रपती संभाजी नगर
मो. 70207 33758

## मनोपनिषद अर्थात मनाचे श्लोक - भाग ६




ज्योतिर्मय साहित्य

इतरांची प्रगतीने सज्जनांना आनंद होतो. पण ज्यांना ती पाहवत नाही त्यांना मत्सर निर्माण होतो आणि मत्सरातून द्वेष जन्म घेतो. आणि मग स्वतःला श्रेष्ठ दाखवण्याचा दंभ सुरू होतो. हे असते आभासी मोठेपणाचे प्रदर्शन. जर मनापासून एखादी गोष्ट कोणी करत नसेल तर टिळे, टोपी, गंधमाळा, भगवे कपडे या सगळ्या गोष्टी म्हणजे सोंग आहेत. जो सगळ्या गोष्टी मनापासून करतो त्याला असे प्रदर्शन करण्याची गरज भासत नाही. पांढरे कपडे घालून समाजसेवेचा आव आणणे, वाङ्मयचौर्य करणे हा देखील असाच प्रकार म्हणता येईल.

जगाच्या पाठीवर या चित्रपटात ग दि माडगूळकर यांनी लिहिलेले एक सुंदर गाणे आहे थकले रे नंदलाला हे गीत आजच्या परिस्थितीचे अतिशय सुंदर वर्णन करते यातील प्रत्येक ओळ आजच्या राजकीय आणि सामाजिक वातावरणाला लागू पडते. या गीतातील निलाजरेपण कटीस नेसले, निसुगपणाचा शेला... यासारखी ओळ असो किंवा विषयवासना वाजे वीणा, अतृप्ती दे ताला... यासारखी ओळ असो त्या आजच्या परिस्थितीचे हुबेहूब वर्णन करतात.



हे विकार सूक्ष्म असतात; पण आत्मविकासाच्या वाटेवर ते खोल दरी निर्माण करतात. राघवाच्या अनंत मार्गावर चालायचे असेल तर बाह्य शत्रूपेक्षा अंतर्गत शत्रूंवर विजय मिळवावा लागतो. हा मार्ग दुसऱ्यांवर विजय मिळवण्याचा नाही; तर स्वतःवर विजय मिळवण्याचा आहे. साधकाला देहबुद्धी ओलांडून आत्मबुद्धीकडे वाटचाल करायची असते. या प्रवासात विकारांवर सतत लक्ष ठेवावे लागते. कारण ते हळूहळू, नकळत मनावर कब्जा करतात.

त्यासाठी मनावर एकदम नियंत्रण मिळवण्याचा प्रयत्न न करता सुरुवात छोट्या छोट्या गोष्टींनी करावी. मोठ्या प्रतिज्ञेपेक्षा छोट्या, सातत्यपूर्ण संयमाचे पाऊल अधिक प्रभावी असते.

स्वसंवाद :


रागाच्या क्षणी मी थांबतो का, की तत्काळ प्रतिक्रिया देतो?

माझ्या इच्छांमध्ये संयम आहे का, की अतिरेक?

इतरांच्या यशाने मला आनंद होतो की मत्सर?

माझ्या यशामागे ईश्वरकृपा आणि इतरांचा देखील वाटा आहे याचे भान मी ठेवतो का ?

बाह्य जग जिंकण्यापेक्षा मी स्वतःवर विजय मिळवण्याचा प्रयत्न करतो का? **(क्रमशः)**






दासबोध स्तवन



उज्वला धर्माधिकारी,
पुणे, मो. ७५८८२ ३५६४६

## श्रवणनिरूपण

ज्योतिर्मय साहित्य


उत्कृष्ट ग्रंथ वाचनाने तसेच परमार्थपर अद्वैत ग्रंथ वाचावेत, त्यामुळे कोणत्याही गोष्टीचा मोह होत नाही. आपल्या प्रत्येक कृतीत सद्गुरु आपल्या बरोबर आहेत अशी मनाची धारणा होते. त्यामुळे वाईट गोष्टी वाईट विचार, वाईट कर्म आपल्या हाताने होत नाहीत. कारण आपली पूर्ण बुध्दी ही सद्गुरूंच्या चरणी समर्पित केली असल्याने आपली संपूर्ण काळजी ते घेतात, साधनेच्या दृष्टीने विचार केला तर साधना जेवढी वाढेल तेवढा आपला प्रवास मोक्षाच्या दिशेने होतो.

आत्मज्ञानी पुरूषाला सारासार विचार विधेयकाची आवड असते ज्याला जे जे आवडेल ते ते ग्रंथ व विवेचनात रूची निर्माण होऊन रममाण होतील. न आवडणारा विषय त्यांना बळेच माथी मारून काही उपयोग होणार नाही. ज्या घरात देवीची उपासना करण्याची पध्दत आहे त्या घरात वेगळ्या देवांची स्तुती पसंत पडत नाही. अनंत व्रताचे पालन ज्या घरात होते तिथे भगवत गीता सांगितली तर ती पचनी पडत नाही कारण अनंतव्रत हे सकाम आहे अमुक एका प्राप्तीसाठी ते केले जाते.

तर भगवत गीता फळाची अपेक्षा न धरता कर्म करायला सांगते. दोन्ही वेगवेगळे विषय आहेत ते समजून घेणे महत्त्वाचे आहे. ज्या वस्तुंचे जिथे स्थान असते तिथे ते शोभून दिसते. आपल्याकडे संपूर्ण भारतभर नानातिर्थे आहेत. प्रत्येक तिर्थाचे स्थान महात्म्य हे वेगवेगळे आहे तुम्ही तिरूपतीला जाऊन बालाजीचीच सेवा पूजापाठ केला पाहिजे. काशीला गेला तर विश्वनाथाची पूजा केली पाहिजे हे सर्व असले तरी आपल्या धर्मग्रंथात विविधतेत एकता आहे हे मात्र निःसंदिग्ध आहे. वैदिक कर्मानुष्ठान करणारा व कर्म संन्नास घेणारा हे दोन्ही पूर्ण पुणे वेगळे आहेत. अमृता समोर ताकाची स्तुती शोभत नाही. तशी एखाद्या तज्ञांच्या समोर नर्तकी आणून काय उपयोग. किंवा एखाद्या भिका-याला लालूच दाखवतात पण संपन्न माणसाला त्याचे काय कौतुक असणार ?

***

## नाम व विकल्प !



श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

ज्योतिर्मय साहित्य

नाम घेऊ लागले की विकल्प उठतात आणि ते घेण्याबद्दलची निष्ठा कमी होते, याला काय करावे ? अशी तक्रार आपण सर्वसाधारणपणे करतो; पण असे होण्यातच नामाचे महत्त्व प्रस्थापित होते हे आपल्या लक्षात येत नाही. मनुष्य नाम घेऊ लागला की विकल्पांना असह्य होते, आणि आता हा नाम घेऊ लागला, आता आपली धडगत नाही, अशा धास्तीने त्यांची चळवळ चालू होते, आणि मनुष्याला नामापासून परावृत्त करण्याचा ते प्रयत्न करतात. विकल्प हे अती सूक्ष्म आहेत. त्यांचे उच्चाटन करायला त्यांच्यापर्यंत पोहोचणारा आणि तितकाच सूक्ष्म असा उपाय पाहिजे. तो उपाय म्हणजे भगवंताचे नाम. एखाद्या बिळात सर्प शिरला तर त्याला बाहेर काढण्याकरिता त्याच्यापर्यंत पोहोचून त्याला तिथे राहणे असह्य करील असाच उपाय करणे जरूर असते. बाहेरून कितीही आरडाओरडा केला तरी त्याचा उपयोग होत नाही. बिळात धूर किंवा गरम पाणी सोडले की तो बाहेर येतो. त्याप्रमाणे, नाम घेतले की विकल्प उठतात, म्हणजे विकल्पांच्या मूळ ठिकाणापर्यंत नामाची आच जाऊन पोचली असे ठरते. तर मग नाम घेऊ लागल्यावर विकल्प येऊ लागले तर गांगरून न जाता, हे सुचिन्ह आहे असे समजून, विकल्पांच्या उच्चाटनाची गुरुकिल्ली मिळाली अशा जाणिवेने, जास्त आस्थेने नाम घेण्याचा निश्चय करावा, हाच त्याला उपाय. नामाबद्दल सुरुवातीला सर्वांचीच वृत्ती साशंक असते, पण आपण सतत नाम घेत गेल्यानेच विकल्प कमी होतात. कोणतीही गोष्ट अभ्यासानेच साध्य होत असते. आज खरी भक्ती नाही म्हणून भगवंताचे स्मरण नाही; आणि भगवंताचे स्मरण ठेवण्याचा अभ्यास केल्याशिवाय खरी भक्ती येत नाही. शहाण्या माणसाने उगीच विकल्प न लढविता भगवंताचे स्मरण ठेवायला आरंभ करावा. विकल्प जाऊन भगवंताचे संकल्प उठू लागले की आपले काम झाले. आपण रस्त्याने चाललो की नको ती माणसे भेटायचीच; पण आपण आपले चालणे चालू ठेवावे. तसे, विकल्प आले तरी आपण आपले नाम सोडू नये. पण गंमत अशी होते की, वाईट मनुष्य भेटला आणि आपण त्याच्याकडे लक्ष द्यायचे नाही असे म्हटले तरी, तो मुद्दाम खाकरतो आणि आपले लक्ष वेधतो. अशा वेळी त्याच्याकडे पाहूनही आपण दुर्लक्ष करतो. त्याचप्रमाणे विकल्पांनी आपले लक्ष ओढून घेतले तर नावडीने लक्ष द्यावे पण आपले नाम सोडू नये. शंका घ्यायचीच झाली तर नाम चालू ठेवून घ्या, म्हणजे ते नामच शंकांचे निरसन करील आणि विकल्पांनाही हळूहळू पायबंद घालील.

पुष्कळ केलेले शंकेने व्यर्थ जाते. आपण नाम सोडणार नाही हे नक्की ठरविले की आपली वृत्ती निःशंक होतेच होते.

## श्री क्षेत्र नैमिष्यारण्य भागवत कथा व हरिनाम सप्ताह

भागवत कथाकार :
आदरणीय श्री चैतन्य महाराज देगलूरकर
कथेचे श्रवण करताना धावते संकलन
मधुकर बोरीकर 9403061886

### ◆दिवस तिसरा◆

पुढे.....
या विश्वाच्या उत्पत्ती साठीचा कारण असणारा परमात्मा त्याला आम्ही नमस्कार करतो. हे मंगलाचरण आहे.
तापत्रय विनाशाय विश्वोतपाद्यही हेतवे
हे स्वरूप लक्षण आहे. शास्त्रांनी तिसरे लक्षणही सांगितले आहे. परमात्मा सदचितानंद आहे.
जर अंधारात चार माणसे चालली व त्यांना दोरी दिसली. पण अंधारात कुणाला तो साप वाटेल, कुणाला कमरेचा बेल्ट वाटेल कुणाला कांहीं.
चार लोकांना दोरीचे चार भ्रम होतील. पण तिथे अचानक प्रकाश पडला तर ज्ञान होते. भ्रम चार असू शकतात पण ज्ञान एकच असते.
रामचंद्र प्रभूंनी नेहमी सत्य भाषण केले. त्यांना सत्य सिद्ध करायला, प्रतिज्ञा पूर्ण करायला आवडते.
दत्तात्रय प्रभू हे चित् म्हणजे ज्ञान प्रधान अवतार होते.
कपिल मुनीही ज्ञान प्रधान तर कृष्ण हे आनंद प्रधान आहेत. तिथेही ज्ञान आहेच पण आनंद प्रमुख. त्यांच्या प्रत्येक लिलेत आनंद आहे. भगवंताचे कर्तृत्व काय तर जग निर्मिती व आनंद निर्मिती. या साठी भगवान आनंद स्वरूप म्हणून कर्तृत्व व आनंद जिथे एकत्रित आहे म्हणून भागवत श्री कृष्णाय वयं नमः श्री कृष्णाला वंदन करते.(मंगलाचरण).
अनेक संप्रदायांनी देवाला नाही पण गुरुला मानले आहे उदा.बौद्ध.
कर्मानि तुमचे अंतःकरण शुद्ध होईल पण ज्ञानाकरिता गुरू कडेच गेले पाहिजे. बाकी शास्त्र ज्ञान असले तरी ब्रम्ह ज्ञान गुगल वरून डाउनलोड होत नाही. ते गुरू कडूनच घेतले गेले पाहिजे.
गोकुळीच्या लोका झाले ब्रम्ह ज्ञान कारण प्रभू गोकुळात येण्यासाठी माया निघून गेली. माया निघून गेल्याने गोपिकांना ब्रम्हज्ञान झाले.
ब्रम्ह ज्ञान झालेल्या गोपिका गर्गाचार्यांना विचारतात ब्रम्ह.. ब्रम्ह म्हणजे काय? गोपिका ब्रम्ह ज्ञान होऊनही त्या ब्रम्ह ज्ञान म्हणजे काय असे विचारतात. कारण माया प्रभू जन्मावेळी तिथून निघून गेल्यामुळे त्यांना ब्रम्ह ज्ञान झाले, ते गुरु मुळे झाले नव्हते. त्यांचा शिक्का बसला नव्हता.
उर्वरित उद्या पाहू.......




## पहाटे तुळशीला पाणी का घालावे?

ज्योतिर्मय साहित्य

आपल्या पुर्वासुरींनी पहाटे प्रत्येकाने तुळशीला पाणी घालावे असे सांगीतले आहे. त्यापाठीमागेपुढील दोन महत्वाची कारणे आहेत.

१) अध्यात्मिक महत्व-

याबाबत पुराणात एक कथा सांगितली जाते. जालिंदर नावाचा एक अत्यंत पराक्रमी राक्षस असतो. आपल्या पराक्रमाच्या बळावर त्याने देवांना आणि साधू-संतांना पार त्राहीत्राही करून सोडलेले असते. त्याला कसे रोखायचे, असा प्रश्न सर्व देवांना पडतो. मग देव विष्णूला शरण जाऊन

जालिंदरापासून आपले रक्षण करण्याची विनंती करतात. विष्णूनी जेव्हा जालिंदराबाबत माहिती काढली, तेव्हा त्यांना असे कळते की, त्याची पत्नी वृंदा ही सतीपतीव्रता असते. तिच्या पातिव्रत्याच्या सामर्थ्यांनेच जालिंदर विजयी होत असतो. त्याला पराजीत करायचे असेल, तर वृंदाच्या पतिव्रत्याचा भंग करणे हाच उपाय उरतो. ते करण्यास कुणीही धजावत नाही. अखेर ती

जबाबदारी विष्णू स्वीकारतात. जालिंदराचे रूप धारण करून विष्णू वृंदेच्या महालात जातात. आपले पती आले आहेत असे समजून वृंदा त्यांना

अलिंगन देते. तिच्या पतिव्रत्याचा भंग होताच, जालिंदराचा मृत्यू होतो. देवांनी मारलेल्या बाणाने त्याचे शीर तुटते आणि ते वृंदेच्या दारात

पडते. नवऱ्याचे शीर पाहताच वृंदा चकीत होते आणि विष्णूला विचारते, तू कोण आहेस? त्यावर विष्णू आपल्या खऱ्या रूपात प्रकटतात. संतप्त झालेली वृंदा विष्णूला तू दगड होऊन पडशील आणि मला माझ्या

पतीचा विरह तुझ्यामुळे घडला, तसाच तुलाही तुझ्या पत्नीचा विरह सहन करावा लागेल, असा शाप देते. भगवंत तिची क्षमा मागतात. तेव्हा वृंदा म्हणते, तू मला आता भ्रष्ट केलेस, आता मला कोण स्विकारील? तेव्हा भगवंत म्हणतात, 'मी तुझा

स्वीकार करतो. इतकेच नव्हे तर जे तुझी पूजा करतील त्यांच्यावर माझी कृपा असेल.' त्यानंतर वृंदा सती

गेली. पुढे तिच्या शापामुळेच राम अवतारामध्ये भगवंताला सीतेचा विरह सहन करावा लागला. देव दगड होऊन पडले. त्यालाच 'शालिग्राम' म्हणतात.

ज्या ठिकाणी तिच्यावर अंत्यसंस्कार झाले, तिथे तुळशीचे रोप उगवले. तीच ही तुळस. वृंदेच्या नावावरूनच ज्या ठिकाणी तुळस लावली जाते,

तिला 'वृंदावन' असे म्हटले जाते. तीच तुळस कृष्णाने, पांडुरंगानेही धारण केली. तिला भगवंताने स्वीकारले याचे प्रतीक म्हणून 'शालिग्राम' हा जो

दगड आहे, त्याला देव मानून त्याचा विवाह तुळशीसोबत लावला जातो. ती भगवंतांची प्रिय होते, म्हणूनच तिला धारण करणा-यांवर भगवंत प्रेम करतो, अशी श्रद्धा आहे. याच विचाराने वारक-यांनीही तुळशीला आजतागायत पूजनीय मानले आहे.

२) वैज्ञानीक महत्व-

जगातील प्रत्येक वनस्पती दिवसा ऑक्सिजन-२ व, रात्री कार्बन डाय ऑक्साईड-२ सोडते. अपवाद फक्त पिंपळ, कारण पिंपळ रात्रीही ऑक्सिजन सोडतो. म्हणुनच भगवान श्रीकृष्णाने म्हटले आहे की, सर्व वृक्षात मी अश्वथ-पिंपळ आहे. मात्र तुळस ही जगातील एकमेव वनस्पती आहे की

जी दिवसा ऑक्सिजन, रात्री कार्बन डाय ऑक्साईड व फक्त पहाटेच्या वेळी ०.०३% इतका ओझोन-३ वायु सोडते. व या वायुच्या संपर्कात **(क्रमशः)**

संकलन -
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी-चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क - ९२ ७१ ६६९ ६६९

## आनंदामृत ....

विचारमंथन प्राचीन वाङ्मयाचे...

अपर्णा परांजपे, कात्रज पुणे
मो. 95030 45495





### वेताळ कथा ४

पुढे....
की ज्याने तिच्या समाधीवर राहून प्रेम जपले?"
राजा म्हणाला -
"ज्याने मंत्राने तिला जिवंत केले तो तिचा पिता समान आहे, कारण त्याने तिला नवे जीवन दिले.
ज्याने अस्थी नेल्या तो पुत्रासारखा आहे.
पण ज्याने तिच्या समाधीजवळ राहून तिच्यावर प्रेम जपले, तोच तिचा योग्य पती मानावा."
राजाचे उत्तर ऐकून वेताळ पुन्हा झाडावर जाऊन लटकला.
मनाचा चौथा स्तर (गूढ संबंध) वेताळ कथा ४ मध्ये मनाचा चौथा स्तर "आसक्ती व प्रेमाचा भेद" सूचित केला आहे.
पहिला स्तर आकर्षण एखाद्या व्यक्तीकडे मन खेचले जाते.
दुसरा स्तर आसक्ती : आपण त्या व्यक्तीला गमावू नये असे वाटते.
तिसरा स्तर निष्ठा : परिस्थिती बदलली तरी मन त्याच स्मरणाशी जोडलेले राहते.
चौथा स्तर प्रेमाची स्थिरता : व्यक्ती नसली तरी प्रेम टिकते.
मानवी प्रेमाचे तीन प्रकार दिसतात : परिस्थितीवर आधारित प्रेम, अपेक्षांवर आधारित प्रेम आणि स्मरणातून टिकणारे प्रेम.
कथा सांगते की खरे प्रेम उपस्थितीवर नाही तर निष्ठेवर उभे असते.
भक्तिमार्गातही हेच दिसते.
सुरुवातीला देवाकडे आकर्षण असते नंतर भक्तीची आसक्ती वाढते आणि शेवटी निष्ठा स्थिर होते त्या वेळी देव दिसो वा न दिसो - भक्ती टिकून राहते.
स्वतःला शांतपणे विचारावा.. माझे प्रेम परिस्थितीवर टिकते की स्मरणावर?
"खरे प्रेम उपस्थितीवर नाही, तर निष्ठेवर टिकते."

भगवंत हृदयस्थ आहे 🙏

# शंकरराव भेलके महाविद्यालयात वार्षिक पारितोषिक वितरण उत्साहात संपन्न

ज्योतिर्मय साहित्य

नरासापूर : पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे, शंकरराव भेलके महाविद्यालय, नसरापूर येथे शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठी वार्षिक पारितोषिक वितरण समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. संस्थेचे अध्यक्ष तसेच महाराष्ट्र राज्याचे भूतपूर्व उपमुख्यमंत्री कै.अजितदादा पवार साहेब यांच्या निधनामुळे सदरचा पारितोषीक वितरण समारंभ महाविद्यालयाने अत्यंत साध्या पद्धतीने पार पाडला, कार्यक्रमाच्या सुरवातीला कार्यक्रमाचे अध्यक्ष तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. तुषार शितोळे, प्रसिद्ध विनोदी लेखक तथा महाविद्यालय विकास समिती सदस्य सु.ल.खुटवड तसेच समन्वयक रचना फाउंडेशन व माजी विद्यार्थी संघाचे अध्यक्ष श्रीपाद कोंडे यांचे शुभहस्ते दीपप्रज्वलन करून सुरुवात करण्यात आली सुरुवातीला संस्थेचे अध्यक्ष तसेच महाराष्ट्र राज्याचे भूतपूर्व उपमुख्यमंत्री कै.अजितदादा पवार साहेब यांना श्रद्धांजली वाहण्यात आली पुढे महाराष्ट्रगीत व राज्यगीताने



कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.

कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून प्रसिद्ध विनोदी लेखक तथा महाविद्यालय विकास समिती सदस्य सु.ल. खुटवड तसेच समन्वयक रचना फाउंडेशन व माजी विद्यार्थी संघाचे अध्यक्ष श्रीपाद कोंडे होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ.पौर्णिमा कारळे यांनी केले प्रास्ताविकामध्ये त्यांनी महाविद्यालयाचा सर्वांगीण आढावा घेतला तसेच महाविद्यालय वेगवेगळ्या क्षेत्रामध्ये प्रगतीपथावर काम करीत असून महाविद्यालयाने समाजामध्ये आपले स्थान बळकट केले आहे असे त्यांनी सांगितले.

यावेळी प्रमुख पाहुण्यांचा परिचय आय.क्यू.ए.सी. समन्वयक डॉ. आर.बी. ढाकणे यांनी करून दिला. तसेच प्रमुख पाहुण्यांचा स्वागत व सत्कार कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. तुषार शितोळे यांच्या शुभहस्ते करण्यात आला.

आपल्या आयुष्याच्या पलीकडेही सुंदर जीवन जीवन आहे त्याचा उपभोग सगळ्यांनी घ्यावा असे प्रतिपादन समन्वयक रचना फाउंडेशन व माजी विद्यार्थी संघाचे अध्यक्ष श्रीपाद कोंडे यांनी यावेळी केले पुढे आपल्या कष्टाची चीज होण्यासाठी ज्ञान महत्वाचे असून आयुष्यत कधीही हार मनू नये असे सांगितले.

प्रमुख पाहुणे म्हणून प्रसिद्ध विनोदी लेखक तथा महाविद्यालय विकास समिती सदस्य सु.ल.खुटवड यांनी महाविद्यालयाने जगण्याची उमेद दिली असून, आयुष्यात विसंगती ज्याला शोधता येतील त्याला चांगले जीवन जगता येईल असे प्रतिपादन केले, पुढे त्यांनी आपल्या आयुष्यातील वेगवेगळे विनोदी किस्से सांगत उपस्थितांची तसेच विद्यार्थ्यांची मने जिंकून आयुष्यात सकारात्मक बदला घेता आला पाहिजे असे सांगितले.

महाविद्यालयीन जीवन हे स्वप्ननाचे जीवन असून ह्या स्पर्धेच्या युगामध्ये वेगवेगळ्या स्पर्धांमध्ये टिकता यायला हवे असे प्रतिपादन कार्यक्रमाचे अध्यक्ष तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. तुषार शितोळे यांनी केले.

यावेळी महाविद्यालयातील परीक्षा, क्रीडा, विद्यापीठ स्तरीय क्रीडा स्पर्धा, महाविद्यालय स्तरावरील क्रीडा स्पर्धा, वेगवेगळ्या वैयक्तिक स्पर्धा, अविष्कार संशोधन स्पर्धा अशा वेगवेगळ्या स्पर्धांमध्ये नैपुण्य मिळविलेल्या सर्व विद्यार्थ्यांचा गौरव यावेळी सर्व सन्माननीय प्रमुख पाहुण्यांच्या शुभहस्ते करण्यात आला. तसेच यावेळी माजी विद्यार्थी संघातर्फे वाणिज्य विभागामध्ये शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये जी गुणवंत विद्यार्थिनी कु. तन्वी सुनील जगताप प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाली आहे तिला कै.रवींद्र कोंडे यांच्या स्मरणार्थ रु.५००० चे रोख बक्षीस देण्यात आले.

यावेळी शैक्षणिक नैपुण्य यांचे वाचन ग्रंथपाल प्रा.भगवान गावित, क्रीडा विभागाचे वाचन डॉ.पौर्णिमा कारळे, सांस्कृतिक विभाग/वाणिज्य विभाग/अविष्कार/एन.एस.एस. या विभागांचे नैपुण्य वाचन प्रा.माऊली कोंडे आणि प्राध्यापक नैपुण्य चे वाचन डॉ,जगदीश शेवते यांनी केले.

कार्यक्रमास पालक प्रतिनिधी, माजी विद्यार्थी संघाचे उपाध्यक्ष आप्पा सावंत, महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक तसेच शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.संदीप लांडगे यांनी केले तर आभार प्रा.सहदेव रोडे यांनी मानले.




# मुत्र विकारासंबंधी महिलांसाठी उन्नतीतर्फे मोफत उपचार शिबीर

ज्योतिर्मय साहित्य

पिंपरी, पुणे : आजघडीला धावपळीच्या जीवनात बहुतांश महिला आपल्या आरोग्याबाबत गांभिर्याने काळजी घेत नाहीत. स्वतःच्या सुदृढीकरणाचा एक भाग म्हणून महिलांनी आपल्या आरोग्याची नियमित तपासणी करणे आवश्यक असल्याचे मत भाजपाच्या नगरसेविका आणि पिंपरी चिंचवड मनपाच्या विधी समिती सदस्या डॉ. कुंदा संजय भिसे यांनी व्यक्त केले. पिंपळे सौदागर येथील उन्नती सोशल फाउंडेशन, उन्नती



सखी मंच आणि अथायु युरो केअर यांच्या संयुक्त विद्यमाने महिला दिनानिमित्त आयोजित मुत्र विकार मोफत आरोग्य तपासणी शिबिरात त्या बोलत होत्या. कोकणे चौकातील अथायु युरो केअर हॉस्पिटलमध्ये शुक्रवारी झालेल्या या कार्यक्रमात डॉ. प्रिती खापरकर यांनी प्रास्ताविक केले. आहारतज्ञ काजोल पांडे यांनी दैनंदिन जीवनातील आहार आणि त्याचे आरोग्यावर होणारे परिणाम याबद्दल माहिती दिली. प्रियदर्शनी आडकर यांनी मुत्रविकाराबाबतची लक्षणे सांगितली. शेवटी डॉ. मयूर नारखेडे यांनी महिला आणि पुरुषांमधील मुतखडा रोगासंदर्भात उपाययोजनांची माहिती दिली.

याप्रसंगी उन्नती सखी मंचच्या उपाध्यक्षा डॉ. रश्मी मोरे तसेच त्यांची टिम, ऑल सिनियर सिटीझन असोसिएशनच्या पदाधिकारी भामिनी महाले यांची प्रमुख उपस्थिती होती. शिबिराच्या यशस्वीतेसाठी अथायु हॉस्पिटलचे गणेश पाटील आणि शिवम देशमुख यांनी परिश्रम घेतले. या शिबिरात परिसरातील महिलांनी किडनी स्टोन, प्रोटेस्ट कॅन्सर, फिमेल युरोलॉजी या संदर्भात तपासणी केली.




# मुंबई महानगरातील आरोग्य सेवेला नवी गती; सामूहिक प्रयत्नातून महत्त्वाचा टप्पा!

ज्योतिर्मय साहित्य

मुंबई : मुंबई महानगर क्षेत्रातील सर्वसामान्य रुग्णांना नामांकित आणि मोठ्या खाजगी रुग्णालयांतून विनामूल्य उपचार मिळावेत, या उद्देशाने एकत्रित आयुष्मान भारत-प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजने अंतर्गत नवीन रुग्णालयांच्या अंगीकरणाबाबत आज मंत्रालयात एक महत्त्वपूर्ण बैठक संपन्न झाली.

प्रशासकीय समन्वय आणि जनहिताची तळमळ असल्यास मोठे बदल घडवता येतात, हेच आजच्या या बैठकीच्या सकारात्मक वातावरणातून अधोरेखित झाले.



याप्रसंगी सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री मा. ना .प्रकाशजी आबिटकर, आरोग्य राज्यमंत्री मा. ना.सौ. मेघनाताई साकोरे-बोर्डीकर आणि सार्वजनिक आरोग्य विभागाचे सचिव श्री. निपुण विनायक यांची प्रमुख उपस्थिती होती. बैठकीस आ.मनीषाताई चौधरी, आ. संजय जी उपाध्याय,आ. पराग आळवणी, आ.शांताराम मोरे, आ. सुलभाताई गायकवाड, आ. अभिजीत पाटील, आ चंद्रकांत पाटील,आ. लांडे मामा, आ. म्हात्रेजी आदी मान्यवर उपस्थित होते. या प्रक्रियेत राज्य आरोग्य हमी सोसायटीचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. आण्णासाहेब चव्हाण, मुंबईतील नामांकित रुग्णालयांचे वरिष्ठ प्रतिनिधी आणि संबंधित विभागाचे वरिष्ठ अधिकारी यांच्या संयुक्त सहभागामुळे व चर्चा विनिमयामुळे एक महत्त्वाचा मार्ग मोकळा झाला आहे.

''सर्वसामान्यांचे आरोग्य रक्षण'' हेच आमचे अंतिम ध्येय असून, सर्वांच्या सामूहिक प्रयत्नांमुळे मुंबईतील आरोग्य व्यवस्था अधिक लोकाभिमुख आणि सक्षम होण्यास मोठी मदत होणार आहे. स्थळ: परिषद सभागृह, विस्तार इमारत, मंत्रालय, मुंबई.





# ऑंथिया ज्येष्ठ नागरिक पिंपरी यांचा साहित्य कट्टा साजरा

ज्योतिर्मय साहित्य

पिंपरी पुणे : ऑंथिया ज्येष्ठ नागरिक यांचा साहित्य कट्टा क्र १६३ हा छत्रपती संभाजी महाराज यांच्या मोशी येथील भव्य पुतळ्याच्या चरणांशी संपन्न झाला. दि. १३ मार्च २०२६ रोजी सकाळी ९ ते १ पर्यंत हा कट्टा त्या परिसरात सुमारे २५ ते ३० व्यक्तींच्या उपस्थितीत वीर रस पूर्ण वातावरणात पार पडला. साहित्य कट्टा प्रमुख शिरीषकुमार पाठक ह्यांनी प्रारंभी शिवरारायांचा ध्येय - मंत्र आणि संभाजी राजे यांचा प्रेरणा मंत्र उच्चारण करत सर्व कट्टा प्रेमींना भारुन टाकले.नंतर प्रत्येक उपस्थित व्यक्तीने संभाजीराजे यांना मनापासून शब्दांजली अर्पण केली.

शिरीषकुमार पाठक यांनी तद्नंतर भारतातील हटके बातम्या सांगून त्यांच्या विचारांना चालना दिली. मराठी व्याकरणाचा एक भाग म्हणून शब्दसंपत्ती सांगून ज्ञानवर्धक प्रश्न विचारले व बरोबर उत्तरे देणारे यांना उत्तेजन म्हणून रोख बक्षिसे दिली. या उपक्रमात पूर्वत, मिसाळ, मिरपगार, कोंढारे, नारायण जोशी, जय चव्हाण, सौ. वसुंधरा कानडे यांनीही आपले विचार व्यक्त केले. तर प्रभाकर पिलखाने यांनी समायोजित गीत गायन केले. श्री गुरव यांनी



संभाजी महाराज बलिदान मास बद्दल सविस्तर माहिती दिली. मोशीच्या सौ.सोनाली गंगवाल यांनी नाश्ता व सुरुची जेवणाची व्यवस्था केली.






# ।। आलो ईथे रिकामा, बहरून जात आहे ।।

ज्योतिर्मय साहित्य

--चिंतामणी त्र्यं. खानोलकर /आरती प्रभु हे नाव मराठी साहित्यात आणि मराठी वाचकाला अनोळखी नाही. प्रतिभासंपन्न कवी, कादंबरीकार, कथाकार, आणि नाटककार म्हणून लोकप्रिय व्यक्तिमत्व. खानोलकरांचा जन्म ८ मार्च१९३० आणि मृत्यू २६ एप्रिल १९७६. उणे पुरे सेहेचाळीस वर्षाचे आयुष्य लाभले संघर्षमय जीवन वाट्याला आले.अलकिक प्रतिभेच देणं लाभलेल्या खानोलकरांना अनेक कठीण प्रसंगाला सामोरे जाव लागल.तरीही - आपल्या अल्पायुष्यात अजगर, गणूराया आणि चानी, त्रिशंकू, कोंडुरा, पाषाणपालवी, पिशाच्च, ह्या कादंबऱ्या.

जोगवा, दिवेलागण, नक्षत्रांचे देणे असे आशयघन काव्य संग्रह त्यांच्या शब्दावरच प्रभुत्व दाखवतात.

राखी पाखरू, सनई हे कथासंग्रह.

अजब न्याय वर्तळाचा, अवध्य, एक शून्य बाजीराव, कालाय तस्मै नमः, रखेली, श्रीमंत पतीची राणी, सगेसोयरे हयवदन, अभोगी इ.नाटके. ज्यांच नाट्य सृष्टीत वेगळच स्थान होत. चानी, कोंडुरावर चित्रपट निघालेत. खूप मोठ्या साहित्याची निर्मिती त्यांचे कडून झाली... प्रतिभेच खूप मोठ देणं त्यांना लाभल होत हे मान्यच कराव लागेल. अस्सल कोकणी बाजाच्या कथा हे त्यांच वशिष्ट होत. माणसाच अस्तित्व,माणूस आणि निसर्ग, माणसातले विकार, वृत्ती, यावर त्यांनी लिखाण केल. त्यांच्या कथा-कविता मधिल प्रतिमा वाचकाला भूरळ पाडतात. नक्षत्रांचे देणे काव्य संग्रहाला साहित्य अकादमी पुरस्कार मिळाला. अनेक नाटकाला महाराष्ट्र राज्य पुरस्कार मिळालेत.

गेले द्यायचे राहूनी तुझे नक्षत्रांचे देणे....

ये रे घना ये रे घना न्हाउ घाल माझ्या मना...

नाही कशी म्हणू तुला म्हणते रे गित ....

कसे ? कसे हासायचे ....

समईच्या शुभ्र कळ्या ....

अशी अजरामर भावगीते,

कुणाच्या खांद्यावर कुणाचे ओझे ...(सामना)

तू तेव्हा तशी तू तेव्हा अशी ...(निवडुंग)

तो एक राजपुत्र.. मी एक रानफूल ..(चानी)

लवलव करी पात.। (निवडुंग)..


मीच मला पाहते.. पाहते आजच का...(यशोदा)

अशी प्रसिद्ध चित्रपट गितं, त्याच्या प्रतिभा संपन्न लेखणीतून लिहिली गेली. आजही ती रसिकांचे मना मनात आहे.

खानोलकर गेल्या नंतर त्यांचेवर प्रेम करणाऱ्या अनेक मान्यवरांनी त्यांचे विषयी आपल्या भावना व्यक्त केल्या होत्या, त्यात पु.ल. देशपांडे, हृदयनाथ मंगेशकर, श्री.ना. पेंडसे, विद्याधर भागवत,जया दडकर, मधुमंगेश कर्णिक, यशवंत कानिटकर, आदींचा समावेश होता.. खानोलकरांचे विषयी आपुलकी, प्रेम, त्यातून दिसून येते.

खानोलकरांच्या साहित्य निर्मिती मागील पार्श्वभुमी अद्भुत, आणि काहीशी अनाकलनीय होती. पु.ल. देशपांडे त्यांचे विषयी लिहितात -- -''असे वाटते की खानोलकरवर काही लिहू नये,त्याच्या पुस्तकातून जो खानोलकर आता हाती उरला आहे त्यालाच घेऊन एकटे बसावे, त्या पुस्तकातून त्यालाच घेऊन एकटे बसावे. त्या पुस्तकांतून त्यालाच बोलू द्यावे. त्याचेच ऐकत रहाव''. त्याच्या त्या लोकविलक्षण अनुभवांची खोली गाठण्याची आपली ऐपत आहे का नाही ते अजमावीत राहावे. श्वास कोंडायला लागला तर स्वतःच्याच मनाशी पराजय मान्य करावा.चूप बसावे. हा एक नवलाचा पक्षी ह्या मराठी साहित्यात आला काय, गायला काय,नाचला काय,कधी कळले -कळलेसे वाटणारे बोलला काय आणि कळण्या - न कळण्याच्या सीमेवरचे काही तरी सांगता सांगता एकदम पुन्हा ज्या अज्ञात घरट्यातून आला होता तिथे निघूनही गेला काय?त्याच्या निर्मितीसारखेच सारे काही अदभुत.


खानोलकरचा हात असंख्य वेळा हातात घ्यायला हवा होता. खानोलकरने ''नक्षत्रांचे देणे '' हा कविता संग्रह मला अर्पण केला होता.मला पत्ता नव्हता एके दिवशी पोष्टाने प्रत आली.वर ''सप्रेम भेट'' असे लिहून खाली चि.त्र्यं.खानोलकर ही सही. अठ्ठावीस एप्रिल पंचाहत्तर तारीख. संग्रह उघडला तर दुसऱ्या पानावर ''पु.ल.देशपांडे यांना''- हा छापील मजकूर. मी थंडच झालो. खानोलकरला पत्र पाठवून विचारले की,''बाबा रे, माझा हा गरव कशासाठी ? २३जून ७५ ला खानोलकरचे उत्तर आले. त्यातली शेवटची वाक्ये होती:.....''अजून खूप लिहायचंय, खूप मोठा पल्ला गाठायचाय.... आशीर्वाद घेत घेत चाललोय. ''कुठला तरी भलताच पल्ला गाठायला खानोलकर निघून गेला. मनाला एकच रूखरूख वाटते की, त्याच्या असामान्य प्रतिभेच्या दर्शनाने थक्क होऊन मनात लिहून ठेवलेली शरणचिठ्ठी त्याच्या हातात वेळच्या वेळी पोहचायला पाहिजे होती. छे! फारच उशीर झाला.




श्री.ना. पेंडसे म्हणतात ''काव्य''ही खानोलकरांची सत्तेची दलत.कथा,कादंबरी, नाटक,हे नाही म्हटलं तरी अंकित प्रदेश. पण हे तिन्ही प्रकार त्यांनी अशा उंचीवर नेल की दौलतीचा प्रदेश संपतो कुठे तेच कळेनास होत.खानोलकरांच्या लेखनाचा वेग लक्षात घेता ते इतकं संपन्न लेखन करतात कस ह्याच आश्चर्य वाटे. मी त्यांच्या लेखनापैकी मुक्त दाद दिली ती ''अजगर'' आणि ''चानी'' यांना. कोणत्याही भाषेला भूषण वाटाव्यात अशा या कथा आहेत. तर प्रभाकर पाध्ये म्हणतात - त्यांना दक्षिण कोकणातील जीवनाचे जे खोल दर्शन झाले होते,त्याच्या आदिम अंत:प्रकृतीचा जो साक्षात्कार त्यांना झाला होता त्याची प्राकृतिक रंगरुपे त्यांनी सादर केली. तेथील जीवनाचा ठाव त्यांच्या प्रतिभेने घेतला.तेथील लोकांच्या रक्ताळलेल्या वासना जन्म, मृत्यू, निसर्ग, नियती यांच्या नानाविध विपरीत दर्शनांनी त्यांची भणाणलेली मने यांचे रंगरुप नाद गंधात्मक चित्रण त्यांनी केले. त्यांच्या आदिम प्रकृतींनी प्रेरित झालेल्या जीवनाच्या प्रतिमा त्यांनी रेखाटल्या. त्यांच्या असामान्य यशाचे रहस्य यात आहे.

खानोलकरां विषयक आठवणी सांगताना मधु मंगेश कर्णिक सांगतात-रत्नांगिरीत पंचवीस वर्षापूर्वी (१९५०साली रत्नागिरीला ) ओळख झालेला चिंतामणी त्र्यंबक खानोलकर त्यानंतरच्या काळात माझा एक निकटचा मित्र बनला.कुडाळला त्याची खानावळ होती. दोन वेळ जेवायला चमचमीत मिळत होते. नि मनातली कवितेची वेल दिसामासानी वाढत होती, फुलत होती,बहरत होती....त्याच काळातली आमची मैत्री. आजही आठवणी आल्या की मनाला अतृप्तीची हुरहुर लागते. ट्रंकेतळीच्या जुन्या पैठणीला यावा तसा आठवणींचा हुरहूर लावणारा सुवास मनात दाटून येतो...''सत्यकथा '' मासिक हा आमचा आदर्श होता.१९५४ फ ब्रुवारीत ''आरती प्रभु'' नावाने खानोलकरांची ''शून्य शृंगारते'' ही कविता छापून आली.त्या वेळच्या ''सत्यकथेचा एक एक अंक म्हणजे कथा-कवितांचा एकेक रसरशीत गुच्छच असे.

''जोगवा'' मधल्या कित्येक अप्रतिम कविता चिंतूने (खानोलकरांनी) कुडाळमधल्या ''वीणा गेस्ट हाऊस ''मधल्या माडीवर बसून लिहिल्या आणि आम्ही ''जोगवा'' मध्ये ठायी ठायी




प्रगट झालेल्या त्या निसर्गाच्या सहवासात त्यांचा आस्वाद घेतला. पंचवीस वर्षाचे ऋणानुबंध तोडून हा काव्यप्रदेशातील व्रतस्थ योगी, मराठी साहित्याच्या बगीच्यात आपल्या कवितेच्या हळुवार पाकळ्यांची अथांग पखरण करुन...'' आलो इथे रिकामा, बहरून जात आहे-''अस म्हणत हलकेच निघून गेला....

आमच्यासाठी आयुष्यभर पुरतील अशा सुगंधी कवितांच्या तीन परड्या मागे ठेवून....।

एकोणसाठ साली खानोलकर कुडाळ सोडून मुंबईत आले. मुंबईला कायम घर करण्यासाठी. कुडाळ सोडतांना मनाने उध्वस्त झाले होते.मुंबईला आल्यावर आकाशवाणीत नोकरी धरली.तिथेही त्याचे विषयी झालेल्या गैरसमजाने नोकरी सोडावी लागली. नंतर युनिव्हर्सिटीत कारकुनाची नोकरी धरली. तिथेही मन लागले नाही. सतरा वर्षे खानोलकर मुंबईत राहिले. पण तिथे कधीही रमले नाहीत....

त्यांची आठवण सांगताना जया दडकर सांगतात-खानोलकरांचा जीव गुंतला होता कोकणच्या निसर्गात. शहरी संस्कृतीचा मुखवटा त्यांनी कधी स्वतःच्या चेहऱ्यावर चढवला नाही. ते अखेर पर्यत कोकणीच राहिले. कोकणच्या मातीतले सारे गुणदोष त्यांच्या स्वभावात प्रकर्षाने एकवटले होते.त्यामुळे शहरातले सुसंस्कृत छक्केपंजे जाणून घ्यायचा त्यांनी कधी प्रयत्नही केला नाही. आपल्या लेखणीच्या बळावर संसाराच ओझं सव्वीस वर्ष सांभाळत आलेल्या खानोलकरांना स्वास्थ लाभाव हे नियतीला मंजूर नव्हतं... खानोलकर गेले. पुष्कळशा साहित्यकृती मागं ठेवून...आणि त्याच बरोबर पुष्कळ पुष्कळशा आख्यायिकाही.

मंगेशकरांना ''ये रे घना ये रे घना''...गाणे ध्वनिमुद्रीत करायचे होते..त्यांनी खानोलकरांना पुढील दोन कडवी लिहून देणे विषयी विचारले. शून्यात दृष्टी नेऊन खानोलकरांनी नकारात्म मान हलवली. बरहुकूम कविता लिहिता येत नाही मला असाच अर्थ होता... मग मंगेशकर शांताबाई शेळकेंकडे गेले. शांताबाईंनी त्यांना समजावले. मला लिहता येणार नाही म्हणून त्यांनाही नकार दिला.शेवटी शांताबाईंनी दोन कडवी लिहून दिलीत. कडवी छान लिहिली म्हणून खानोलकरांनी त्यांचे कौतूक केले.गाणं मिळालं म्हणून मंगेशकर जाऊ लागले.तेवढ्यात खानोलकरांनी त्यांना थांबविले.थोडा विचार केला,आणि एका कागदावर अचानक आठ ओळी लिहून दिल्यात...

''टाकुनिया घरदार, नाचणार नाचणार''....

मग शातांबाईंची कडवी रद्द केली. खानोलकरांची कडवी ठेवण्यात आली. शांताबाईंनी त्यांच्या कडव्याच मनापासून कौतूक केलं. मंगेशकर म्हणतात, तुझ्यातला तो कलाकार, तो उमदेपणा,ती मैत्री मी आणि शांताबाई कधी विसरु शकणार नाही.

हृदयनाथ मंगेशकरांनी त्यांची अनेक गीते संगितबध्द केलीत.. ती खूप गाजलीत.त्या दोघांमध्ये एक वेगळेच शब्द-सुरांच नातं होत.ते म्हणतात ''तुझ्या पुस्तकांची पानं माझ्याशी बोलायची. गाणारी पुस्तकं तूच लिहावीस.''

खानोलकरांच पहिलं गीत ''नाही कशी म्हणू तुला, म्हणते रे गीत''मंगेशकरांनीच केल आणी -

''लक्ष हाती बांध दिवे,दे रे आशीर्वाद तमा

उंबऱ्याशी जगणाऱ्या, गिळून टाक रे यमा ''

ही शेवटची ओवीही त्यांनीच रेकार्ड केली.

मंगेशकर सांगतात - तू कितीदा भेटलास,किती किती बोललास, किती किती कविता ऐकवल्यास. पण एकदाही मी तुझ्या अडचणी समजावून घेतल्या नाहीत. कधी विचारलं नाही. तुझ्यासाठी काही करावं हे एकदाही मनात आल नाही याच आश्चर्य वाटतं.कलेवर जगताना काय भोगाव लागत हे मी अनुभवले आहे. पण भिडे पोटी मी तुला विचारले नाही, तू ही काही बोलला नाही.

आरती !माझ्या स्वरांना पोरकं करुन गेलास ना?

तुझ्या शब्दांनी माझ्या स्वरांना नव्हाळी दिली.तुझ्या प्रतिभेच्या भरारीत माझे सूर काही क्षण भिरभिरत राहिले. विसर्जित होत गेले. माझ्या स्वरांचे व्यक्तित्व तुझ्या अभिव्यक्तीत.आणि तुझ्या शब्दामुळे माझ्या सुरांना मिळालेल यश, तू मला दान करुन निघून गेलास.अरे! तुझ्या शब्दात माझे सूर न्हाऊन निघाले. तृप्त झाले. पण आज... मी मात्र अतृप्त.

''गेले द्यायचे राहून ''....खरंच फार फार राहून गेलं.

अरे! हे नक्षत्रांचे देणं तू मला देऊन गेलास.

खरंच मंगेशकर म्हणतात त्या प्रमाणे खानोलकरांनी मराठी साहित्याला, आणि वाचकांना खूप मोठा ठेवा दिला आहे.

आलो ईथे रिकामा, बहरुन जात आहे'' ही आरती प्रभूंच्या एका कवितेतील ओळ आहे....

***

## माझ्या घराभोवतालची जैवविविधता

ज्योतिर्मय साहित्य

(मागील अंकावरून)

आमच्या घराजवळ एक स्वच्छ पाण्याचा ओढा आहे आणि थोड्याच अंतरावर मुठा नदी वाहते. ओढ्याच्या काठावर गवत, झुडपे आणि मोठी झाडे आहेत. त्यामुळे अनेक कीटक, जलचर आणि पक्ष्यांना निवारा मिळतो. पाण्यात मासे, खेकडे तर काठावर बेडूक, सरडे दिसतात. बदक आणि बगळे यांसारखे पक्षीही या परिसरात येतात.



तथापि, वाढते शहरीकरण, वृक्षतोड, प्रदूषण आणि प्लास्टिकचा वापर यामुळे जैवविविधतेवर परिणाम होत आहे. अनेक पक्ष्यांची संख्या कमी होत चालली आहे. काही प्रजाती तर दुर्मिळ होत आहेत. त्यामुळे जैवविविधतेचे संरक्षण करणे अत्यंत आवश्यक आहे.

आपल्या घराभोवतीची जैवविविधता हा निसर्गाने दिलेला अनमोल खजिना आहे. वृक्षारोपण करणे, पाणी व विजेची बचत करणे, प्लास्टिकचा वापर कमी करणे आणि औषधी वनस्पतींची लागवड करणे या छोट्या कृतींमुळे आपण निसर्गाचे संरक्षण करू शकतो. तसेच विद्यार्थ्यांमध्ये निसर्गनिरीक्षण आणि पर्यावरणाबद्दल जागरूकता निर्माण करणेही महत्त्वाचे आहे.



सौ. मानसी चंद्रहास सोनपेठकर
संपर्क क्रमांक : ७२४९१२२४२८

संत तुकाराम महाराज म्हणतात

''वृक्षवल्ली आम्हां सोयरी वनचरे ।

पक्षी ही सुस्वरे आळविती ।।''

या अभंगातील संदेशाप्रमाणे निसर्गातील प्रत्येक घटक आपला सोयरा आहे. त्यामुळे निसर्गाचे संवर्धन करणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे.

''निसर्ग जपूयात, जीवन वाचवूयात.''

## ''मुक्ति संघ''चे हेमचंद्र घोष

ज्योतिर्मय साहित्य

(मागील अंकावरून)

१९२८ कलकत्ता काँग्रेस अधिवेशन हे एक मोठे वळणबिंदू हेमचंद्र घोष यांच्यासाठी ठरले. नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या मार्गदर्शनाखाली या अधिवेशनाच्या निमित्ताने मुक्ती संघाची स्वतःची शिस्तबद्ध स्वयंसेवक फौज हेमचंद्र यांनी उभी केली. या दलाचे नाव ''बेंगॉल व्हॉलंटियर्स''असे ठेवण्यात आले. या संस्थेचे संस्थापक व मार्गदर्शक म्हणून हेमचंद्र घोष हेच होते. नेताजी सुभाषचंद्र बोस अधिवेशनातील मुख्य आयोजक व बेंगाल व्हॉलिंटियर्सचे राजकीय कमांडर होते. गोपीनाथ साहा यांच्या १९२४ च्या फाशीनंतर कलकत्त्यातील हर्टल येथील त्यांच्या शवयात्रेत आणि मोर्चात हेमचंद्र घोष यांच्या नेतृत्वाखाली बेंगाल व्हॉलिंटियर्सने नेताजी यांच्यासह स्वयंसेवकांचे नेतृत्व केले ज्यामुळे ब्रिटिशांवर दबाव वाढला. नेताजी यांच्या सर्व भाषणांना स्वयंसेवकांनी कडे करून संरक्षित केले. ज्यामुळे मोठ्या जमावापुढे ब्रिटिशांना नेताजी यांना अटक करता आली नाही व भाषणे देता आली. १९३० मध्ये मास्टरदा सूर्य सेन यांच्या गटाला



चित्तगाव छाप्या वेळी लष्कर प्रशिक्षण आणि शस्त्रसामग्री पुरवण्यात हेमचंद्र घोष यांनी मदत केली. स्वयंसेवकांनी क्रांतीकारकांना स्वयंसेवक सैनिक म्हणून लपविले. १९३० पासून १९४६ पर्यंत बंगाल व्हॉलिंटियर्स चे कार्याने ब्रिटिशांनी हेमचंद्र घोष यांना तुरूंगात डांबले. तुरूंगातून हेमचंद्र घोष बाहेर असतील तर मोठा उठाव भारतभर होईल यासाठी हे पाऊल उचलण्यात आले.




हेमचंद्र घोष यांच्या बंगाल व्हॉलिंटियर्स संघटनेने ते तुरूंगात असले तरी विनय-बादल-दिनेश यांचा रायटर्स बिल्डींग हल्ला, अँडरसनवरील हल्ले यासाठी पुढाकार घेतला. नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या १९४१ साली काबूलमार्गे जर्मनी पलायनापर्यंत त्यांना या संघटनेने पूर्ण सहकार्य केले. या संघटनेचे नेटवर्क यासाठी महत्वाचे ठरते. हेमचंद्र घोष हे १९४६-४७ च्या सुमारास तुरूंगातून सुटले. त्यानंतर त्यांनी कोणत्याही सक्रीय भूमिकेत न राहण्याचे ठरवीत १९४७ नंतर प्रामुख्याने निवांत साध्या जीवनात राहिले. आपली ओळख जुने क्रांतीकारक म्हणून त्यांनी स्वीकारत स्वातंत्र्यसैनिक पेन्शन, सन्मान ताम्रपत्र यांना स्पष्ट नकार दिला. त्यांनी आपल्या पूर्वीच्या मुक्ती संघ- बंगाल व्हॉलिटियर्स मधील तरुणांना स्वातंत्र्योत्तर संविधानिक राजकारण व समाजकार्यात सामील होण्यासाठी प्रोत्साहन दिले. स्वातंत्र्यलढ्यात केलेले कार्य पैशात मोजणे योग्य नाही ही त्याची भावना होती. स्वतःच्या दैदिप्यमान कार्याचा इतिहास न मिरवता ३१ ऑक्टोबर १९८० रोजी वयाच्या ९६ व्या वर्षी शेवटचा श्वास घेईपर्यंत त्यांनी आपले जीवन स्वतंत्र भारतात व्यतित केले. आपल्या आयुष्याची जवळपास ४५ वर्षे स्वातंत्र्यलढ्यासाठी समर्पित करणारा हा योद्धा आपण कसे साधेपणाने जगावे याचे बाळकडू देऊन गेले.

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी-चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559